MHCO110004502024

MHCO110004502024

सादर दिनांक : ०५.११.२०२४
नोंदणी दिनांक : ०५.११.२०२४
निकाल दिनांक : २९.०८२०२६
कालावधी : वर्ष महिने दिवस
०१ ०९ २४

## न्यायाधीश, सहकार न्यायालय सातारा यांचे न्यायालयात

**पिठासीन अधिकारी श्रीम. स्वप्नाली मेथाजी वाघमारे**

**सहकार दावा** : ४४१/२०२४

**निशाणी :**

स्टेट ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन एम्पलॉईज
फलटण डेपो को—ऑप केडिट सोसायटी
लि. फलटण आगार जि. सातारा
श्री. संदीप वसंतराव पवार

**विरुध्द**

१. श्री. राहुल कालिदास कदम—मयत प्रतिवादी
१अ. श्रीम. जयश्री राहुल कदम

MHCO110004502024

वय—४० धंदा—गृहिणी

१ब. श्री. सुजल राहुल कदम

वय—२० धंदा—शिक्षण

१क. वैष्णवी राहुल कदम

वय—१५ धंदा—शिक्षण

१ड. श्री. राजवीर राहुल कदम

वय—१० धंदा—शिक्षण

प्रतिवादी क्र. १अ ते ड रा. राजाळे

ता.फलटण जि. सातारा.

२. श्री. संपत सुरेश चव्हाण

वय—५२ धंदा—नोकरी

रा. दहिगाव ता. कोरेगाव

जि. सातारा.

३. श्री. सुर्यकांत नारायण पवार

वय—५० धंदा—नोकरी

रा. आंदरुड ता. फलटण

जि. सातारा.

**दावा कर्ज रक्कम रु. २,६९,७१६/—**

.........................................................................................

वादी तर्फे ॲड. ए. के. शिंदे

प्रतिवादी क्र. १अ ते ड एकतर्फा

प्रतिवादी क्र. २ व ३ विनाकैफियत

..............................................................................................

## न्यायनिर्णय

**(दिनांक — २९.०८.२०२६)**

१. प्रस्तुत वादी यांनी प्रतिवादी म्हणजेच कर्जदार व जामीनदार यांचेकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसुल होणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

२. **वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे ...**

वादी संस्था ही महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार नोंदणीकृत झालेली संस्था आहे. सदर पतसंस्थेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. संदीप वसंतराव पवार यांना पत संस्थेचे वतीने कर्ज संबंधी कामकाज पाहणेसाठी अधिकारपत्र देणेत आलेले आहे. मयत श्री. राहुल कदम यांनी वादी संस्थेकडे रक्कम रु. २,००,०००/— ची कर्ज मागणी केली होती. मयत श्री. राहुल कदम यांची अडचण लक्षात घेता वादी पतसंस्थेने त्यांना दिनांक २४/०२/२०२१ रोजी रक्कम रु. २,००,०००/— चे कर्ज द.सा.द.शे १० टकके दराने मंजूर केले होते. सदर कर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ जामीनदार राहिले असून ते कर्जाचे परतफेडीकरिता वैयक्तिक व सामुदायिकरित्या जबाबदार असलेचे त्यांनी लिहून दिले. मुळ कर्जदार मयत असून प्रतिवादी क्र. १अ ते ड हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. मयत श्री. राहुल कदम कर्जदार तसेच प्रतिवादी २ व ३ हे जामीनदार यांनी करारनाम्याप्रमाणे व कर्जासंबंधीच्या अटी शर्तीनुसार दिलेल्या कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे कर्ज थकीत राहिले आहे. दिनांक. २३/०९/२०२४ अखेर कर्ज खाते उतार्‍यानुसार व्याजासहित व इतर खर्चासहित प्रतिवादी यांचेकडून कर्ज रक्कम रु. २,६९,७१६/— व सदर रक्कमेवर १० टकके प्रमाणे व्याजासह होणारी एकूण कर्ज रक्कम प्रतिवादी हे वादी पतसंस्थेस देणे लागतात. वादी यांनी दि. ०९/०९/२०२३ रोजी विधिज्ञांमार्फत प्रतिवादी यांना रक्कम मागणे नोटीस पाठवून थकीत कर्जाची मागणी केली. परंतु सदर नोटीस मिळून देखील प्रतिवादी यांनी थकीत कर्जाची परतफेड केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादी पतसंस्थेने प्रतिवादी यांचेकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसूल होउन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ यांना समन्सची बजावणी झालेनंतर प्रतिवादी क्र. १अ ते ड हे दाव्यात हजर झाले नाहीत. त्यामुळे दि. ०४/१२/२०२५ रोजी त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविणेचा आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादी क्र. २ व ३ हे दाव्यात हजर झाले परंतु कायद्यातील विहित कालावधीत त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे दि. १७/०२/२०२६ रोजी त्यांचेविरुध्द दावा विनाकैफियतचा आदेश पारित करणेत आला.

५. दाव्याचा अभिलेख पाहिला. वादी यांचे विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध वादी कथनावरुन खालील मुद्दे माझ्यापुढे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे—

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी पतसंस्था यांनी मयत श्री. राहुल कदम यांना रक्कम रु. २,००,०००/— चे कर्ज दिले होते हे वादी शाबित करतात काय? | होकारार्थी |
| २ | वादी यांना प्रतिवादी यांचेकडून रक्कम रु. २,६९,७१६/— येणे बाकी असलेचे वादी शाबित करतात काय? | होकारार्थी |
| ३ | वादी मागणी करतात त्याप्रमाणे व्याजासहित रक्कम मिळणेस पात्र आहेत काय? | १० टकके व्याजदर |
| ४ | काय आदेश आणि निवाडा? | अंतिम आदेशानुसार |

६. वादीतर्फे सादर केलेल्या साक्षीदाराचे तपशील खालीलप्रमाणे—

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १ | श्री. संदीप वसंतराव पवार | १६ |

७. वादीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याचा तपशील खालीलप्रमाणे—

| अ.क्र | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १ | साक्षीदाराचे अधिकारपत्र | १७ |
| २ | कर्जखाते उतारा | ३२ |

| | | |
|---|---|---|
| ३ | कर्ज मागणी अर्ज | २१ |
| ४ | जामीन कदबा | २२ |
| ५ | कर्जरोखा | २० |
| ६ | वचनचिठ्ठी | १९ |
| ७ | नोटीस | २३—२९ |

८. वादीतर्फे निशाणी ३३ कडे पुरशीस दाखल करुन पुरावा बंद करणेत आला.

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ करिता —</u>**

९. वादीतर्फे दाव्यातील कथनाचे शाबितीकरिता साक्षीदार क्र. १ श्री. संदीप वसंतराव पवार, निशाणी १६ यांचा पुरावा दाखल करणेत आला. सदर पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात साक्षीदाराने दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. वादीचे कथनानुसार मयत श्री. राहुल कदम यांनी वादी संस्थेकडे कर्ज मागणी अर्ज देउन रक्कम रु. २,००,०००/— कर्जाची मागणी केली होती. सदर कर्ज मागणी अर्जाची प्रत वादीने निशाणी २१ कडे हजर केलेली आहे. सदर अर्जावरती मयत श्री. राहुल कदम यांचे नाव कर्जदार म्हणून नमूद केल्याचे दिसते. तसेच वादी यांनी मयत श्री. राहुल कदम यांचे कर्ज खाते उतार्‍याची प्रत निशाणी ३२ कडे दाखल केली आहे. त्यानुसार दि. २४/०२/२०२१ रोजी वादी संस्थेने रक्कम रु. २,००,०००/— मयत श्री. राहुल कदम यांना दिल्याचे दिसते. वादी यांचे तोंडी पुराव्यावरुन तसेच अभिलेखावरील कागदोप़त्री पुराव्यावरुन मयत श्री. राहुल कदम यांनी कर्ज मागणी

केलेचे व सदर मागणीवरुन त्याना रक्कम रु. २,००,०००/— मंजूर झाल्याचे तसेच खाते उतार्‍यानुसार सदर कर्ज रक्कम पूर्णपणे परतफेड झाली नसलेचे दिसून येते त्यामुळे मी मुद्दा क्र. १ करिता होकारार्थी उत्तर नोंदविते.

**मुद्दा क्र. २ व ३ करिता—**

१०. वादी यांचेतर्फे निशाणी १७ कडे ठरावाची प्रत सादर करुन श्री. संदीप वसंतराव पवार यांना वादी पतसंस्थेने पुरावा देणेचे अधिकार दिलेचे दिसून येते. त्यानुसार साक्षीदार क्र. १ यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, कर्जखाते उतार्‍यावरुन कर्ज रक्कमेची पूर्ण फेड झाली नसलेचे दिसते. अशा परिस्थितीत वादी पतसंस्थेकडून प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ यांना रक्कम मागणी नोटीस पाठवून कर्ज रक्कमेची मागणी केली गेली. त्या नोटीस व पोचपावती प्रत निशाणी २३ ते २९ कडे हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना वादीने नोटीस पाठवून थकबाकी रक्कम रु. २,६९,७१६/— ची मागणी केल्याचे दिसते. सदर नोटीस मिळालेपासून १५ दिवसाचे आत कर्ज रक्कम व त्यावरील व्याज प्रतिवादी यांनी भरावे असे देखील नोटीसमध्ये नमूद आहे. सदर नोटीशीकरिता अगर दाव्यातील पुराव्याला प्रतिवादी यांनी आव्हानित केलेले नाही. त्यामुळे वादीचा पुरावा विनाआव्हानित राहतो. व तो प्रतिवादीचे विरुध्द शाबित होतो.

११. साक्षीदार क्र. १ यांचे कथनानुसार प्रतिवादी क्र. २ व ३ हे मयत श्री. राहुल कदम यांचे कर्जास जामिनदार आहेत. सदर कथनाचे पुष्ठर्थ वादी यांनी निशाणी २२ व १९ कडे जामीन कदबा व वचनचिठ्ठीची प्रत हजर केली आहे. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ व ३ हे मयत श्री. राहुल कदम यांनी

घेतलेल्या रक्कम रु. २,००,०००/— चे कर्जास जामीन असल्याचे दिसून येते. तसेच मयत श्री. राहुल कदम यांनी घेतलेले कर्ज व्याजासह परत देणेची हमी प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी लिहून दिली असल्याचे दिसते. जामीन कदबा व वचनचिठ्ठीवर प्रतिवादी २ व ३ यांची नावे जामीनदार म्हणून नमूद असल्याचे दिसते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २ व ३ हे मयत श्री. राहुल कदम यांनी घेतलेल्या कर्जास जामीनदार राहिले असल्याचे शाबित होते.

१२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी यांनी कर्जाची परतफेड केलेली नाही. प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ यांनी दाव्यामध्ये हजर राहून त्यांचे म्हणणे मांडून व त्यांचेतर्फे पुरावा सादर करुन वादीचे दाव्यातील कथने आव्हानित केलेली नाहीत. त्यामुळे वादीतर्फे सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा विनाआव्हानित राहून शाबित झालेला आहे. प्रतिवादी यांनी रक्कम रु. २,००,०००/— वादी संस्थेला दिलेबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे निशाणी ३२ कडील कर्जखाते उतार्‍याचे अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांना रक्कम रु. २,६९,७१६/— देणे लागतात, असे दिसून येते. त्याकरिता प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ हे वैयक्तिक व संयुक्तिकरित्या जबाबदार असल्याचे स्पष्ट दिसून येते. वादी यांनी १० टकके व्याज दराने कर्ज रक्कम वसूल होणेची मागणी केली आहे. निशाणी १९ कडील वचनचिठ्ठीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये कर्जावरील व्याज दर द.सा.द.शे १० टकके दराने राहील, असा मजकूर नमूद केले आहे. नि. ३२ कडील खाते उतार्‍यानुसार प्रतिवादी यांनी दि. ३१/०३/२०२४ अखेर कर्जापोटी रक्कम भरली असलेचे दिसते. व दि. ३१/०३/२०२४ पासून रक्कम रु. २,००,०००/— कर्जखातेमध्ये शिल्लक असलेचे दिसते. त्यामुळे रक्कम रु. २,००,०००/— करिता द.सा.द.शे १० टकके दराने दि. ३१/०३/२०२४ पासून

मंजूर करणे न्यायउचित ठरेल. अशा परिस्थितीत सदरची बाब वर नमूद पुराव्याचे आधारे वादीने शाबित केली आहे. सबब मी मुद्दा २ व ३ करिता होकारार्थी उत्तर नोंदविते.

**मुद्दा क्र. ४ करिता—**

१३. अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे आधारे प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ यांनी वैयक्तिक व संयुक्तिक रित्या वादी संस्थेस रक्कम रु. २,००,०००/— द.सा.द.शे १० टक्के व्याज दराने देणे लागतात हे शाबित झाले आहे. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्षाचे आधारे मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. दावा अंशतः मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी १अ ते ड, २ व ३ यांनी कर्जाची रक्कम रु. २,००,०००/— (अक्षरी —दोन लाख रुपये फकत) वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीला परत करावेत.

३. प्रतिवादी क्र. १अ ते ड, २ व ३ यांनी थकीत कर्ज रक्कमेवर दिनांक ३१/०३/२०२४ पासून द.सा.द.शे १० टक्के व्याजदराने ते रक्कम वसूल होईपर्यंत होणारी रक्कम परत करावी.

MHCO110004502024

४. वादी व प्रतिवादी यांनी दाव्याचा खर्च आपापला सोसावा.

५. येणेप्रमाणे निवाडा करणेत यावा.

खुला न्यायालयात सदर निकाल घोषित करणेत आला.

WAGHAMARE SWAPNALI METHAJI

Digitally signed by WAGHAMARE SWAPNALI METHAJI
Date: 2026.08.29 17:24:01 +0530

ठिकाण — सातारा

दिनांक — २९.०८.२०२६

**श्रीम. एस. एम. वाघमारे**

**न्यायाधीश**

**सहकार न्यायालय, सातारा.**